NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(दुपार)

दिनांक ०७.११.२०२६ शनिवार

(कामगिरी)

१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :–

दिनांक ०६.११.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये ०४ केसेसमध्ये ०६ ईसमावर कारवाई करून एकुण ४८,४५,४०४/–रू. चा मुद्देमाल जप्त केला.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये, ओव्हरस्पीड वाहन चालविणे कलम १८४ मोवाका अन्वये २२ केस, सिग्नल जंपींग कलम २३९/१७७ मोवाका अन्वये ६९ केसेस, विना परवाना वाहन चालविणे कलम १२७ मोवाका अन्वये ६८ केसेस, ऑन रोड पार्कींग कलम १२२/११७ मोवाका अन्वये २३६ केसेस, रॉंग साईड कलम ४/१२२ मोवाका अन्वये ७८ केसेस, अवैध प्रवासी वाहतुक कलम १९४(ए) मोवाका अन्वये ३९ केसेस, ड्रायव्हींग विदाऊट युनिफार्म कलम २१/१८ मोवाका अन्वये ०३ केसेस, ट्रिपलसिट वाहन चालविणे कलम १२८/१७७ मोवाका अन्वये ९२ केसेस, धोकादायकरित्या बेदरकारपणे वाहन चालविणे कलम १८४ मोवाका अन्वये ०३ केस, फॅन्सी नंबरप्लेट कलम ५१/५० सीएमव्हीआर अन्वये १३ केसेस, विदाऊट सिटबेल्ट ड्रायव्हींग कलम १९४ बी(१) मोवाका अन्वये ०८ केसेस, विना हेल्मेट गाडी चालविणे कलम १२९/१७७ मोवाका अन्वये ९५९ केसेस, वाहन चालवितांना भ्रमणध्वनीचा वापर करणे कलम १८४(सि) अन्वये १९ केस, ड्रंकन ड्राईव्ह कलम १८५ मोवाका अन्वये १६ केसेस व इतर कलमांखालील वेगवेगळे गुन्हे असे एकुण १,७३६ वाहन चालकांवर कारवाई करून त्यांचेकडून एकूण रू. ४,७३,७५०/–रू. इतके तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

(गुन्हे)

१) पोलीस ठाणे जरीपटका :– प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.

दिनांक ०६.११.२०२६ चे १४.०० वा. चे सुमारास, फिर्यादीची आई नामे श्रीमती आशालता भाऊराव खोब्रागडे, वय ७६ वर्षे, रा. प्लॉट क्र. ४८१, बेझनबाग, मॉडेल टाऊन, समाधान डेकोरेशन जवळ, इंदोरा, जरीपटका, नागपूर ह्या त्यांचे वस्तीतील अरविंद किराणा स्टोअर्स समोरुन पायदळ जात असता, कोणीतरी अज्ञात दुचाकी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन, रस्त्याने पायी जाणाऱ्या फिर्यादीचे आईस धडक देवुन, घटनास्थळावरून पळुन गेला. अपघातामध्ये फिर्यादीची आईचे डोक्याला मार लागुन, त्या गंभीर जखमी झाल्या. जखमी यांना उपचाराकरीता मदन हॉस्पीटल व तेथुन मेयो हॉस्पिटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासुन मृत घोषीत केले.

याप्रकरणी फिर्यादी पवन भाऊराव खोब्रागडे, वय ५१ वर्षे, रा. प्लॉट क्र. ४८१, बेझनबाग, मॉडेल टाऊन, समाधान डेकोरेशन जवळ, इंदोरा, जरीपटका, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे जरीपटका अज्ञात दुचाकी चालक आरोपीविरूध्द कलम १०६(१), २८१ भा.न्या.सं., सहकलम १३४, १७७, १८४ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

२) पोलीस ठाणे कळमणा :– विनयभंग करणाऱ्या आरोपींना अटक.

पोलीस ठाणे कळमना हद्दीत राहणाऱ्या ३२ वर्षीय फिर्यादी यांचा परिचीत आरोपी नामे १) धुरु कैलाश बुवाडे, वय २७ वर्षे, रा. गाव परसठाणे, पोस्ट करपा, ता. मुलताई, जि. बैतुल, मध्यप्रदेश व त्याचा मित्र २) सचिन विनयकुमार पांडे, वय २९ वर्षे, रा. केजीएन सोसायटी, काटोल रोड, गिट्टीखदान, नागपुर यांनी दिनांक ०५.११.२०२६ चे १४.३० वा. चे सुमारास, फिर्यादी ह्या आपले कामावरुन परत येत असतांना, त्यांचा पाठलाग केला. तसेच, रात्री २३.४० ते २३.५० वा. चे सुमारास, फिर्यादी ह्या आपले मुलीसह त्यांचे घरी झोपल्या असता, दोन्ही आरोपीतांनी फिर्यादीचे घराचा दरवाजा वाजवुन, फिर्यादीसोबत असभ्य व अश्लिल बोलुन, त्यांचे मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून, फिर्यादीचा विनयभंग केला.

अशा फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कळमणा येथे पोउपनि. प्रमोद ढोबळे ७७२१०७९७४९ यांनी आरोपींविरूध्द कलम ७८,७९,७५(१)(२),३३३,३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेता, कळमना पोलीसांनी आरोपींचा शोध घेऊन, दोन्ही आरोपींना तात्काळ अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

३) पोलीस ठाणे नंदनवन :– गंभीर दुखापत करणाऱ्या आरोपींना अटक.

पोलीस ठाणे नंदनवन हद्दीत, न्यु पॅन्थर नगर, वाठोडा रोड, गुप्ता इलेक्ट्रानिक्स जवळ, नंदनवन, नागपूर येथे राहणारे फिर्यादी नामे देवेंद्र उत्तमराव सावरकर, वय ५० वर्षे व त्यांचे परिचीत आरोपी क्र. १) अमन उत्तम मेश्राम, वय २५ वर्षे, २) अश्लेष शिवशंकर अडीकने, वय २९ वर्षे, दोन्ही रा. पडोळे नगर, कुशीनारा बुध्द विहारजवळ, वाठोडा रोड, नंदनवन, नागपुर हे दारु पिण्याचे सवईचे आहेत. दिनांक ०५.११.२०२६ चे १३.१० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे नंदनवन हद्दीत संघर्षनंगर रोडवरील फिर्यादी देशी दारु दुकानात दारु पिण्याकरीता गेले असता, तेथुन बाहेर येत असतांना, दोन्ही आरोपी हे फिर्यादीचे मित्र नामे पिंटु कांबळे यांना शिवीगाळी करतांना दिसल्याने, फिर्यादी यांनी मध्यस्थी करुन भांडण मिटविण्याचा प्रयत्न केला. आरोपींना याचा राग आल्याने त्यांनी फिर्यादीस हातबुक्कीने मारहाण करुन, आरोपी क्र. २ याने त्याचे हातातील लोखंडी कड्याने फिर्यादीचे डोक्यावर मारुन तसेच, आरोपी क्र. १ याने रोडवरील दगड फिर्यादीस फेकुन मारल्याने, फिर्यादीचे पायाला लागुन त्यांचा पाय फ्रक्चर होवुन फिर्यादी गंभीर जखमी झाले. जखमी फिर्यादी यांचा उपचार मेडीकल हॉस्पीटल येथे करण्यात आला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे नंदनवन येथे मपोउपनि. रुपाली सकपाळ ८१४९११९२७६ यांनी आरोपींविरूध्द कलम ११८(२), ३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करुन, दोन्ही आरोपींचा शोध घेवुन, त्यांना अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

स्वा/–
(अंकुश राठोड)
पोलीस उप निरीक्षक,
पोलीस जनसंपर्क अधिकारी,
नागपुर शहर.